# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

सिडको भवन, २ रा मजला, दक्षिण कक्ष, बेलापूर, नवी मुंबई-४०० ६१४.
दूरध्वनी: (०२२) २७५७१६७३, २७५७०१६६, २७५७१६७७.
ईमेल : estt1mjp@gmail.com

जा.क्र.मजीप्रा-२०२३/प्र.क्र.५९/पदो./आ-१ (उविअ),/२० दिनांक :- २१ /०८/२०२४

**उप अभियंता (स्थापत्य) यांना कार्यकारी अभियंता (स्थापत्य) या पदोन्नतीच्या कोटयातील नियमित रिक्त पदावर तात्पुरती पदोन्नती देणेबाबत.**

## कार्यालयीन आदेश

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र क्र. बीसीसी-२०१८/प्र.क्र.३६६/१६-ब, दिनांक ७.५.२०२१ मध्ये मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी याचिका क्रमांक २७९७/२०१५ या प्रकरणी दि.४.८.२०१७ रोजी दिलेल्या निर्णयान्वये पदोन्नतीतील आरक्षण अवैध ठरविले असल्याने व मा.उच्च न्यायालयाने मा.सर्वोच्च न्यायालयाने मा.उच्च न्यायालयाच्या या निर्णयास अद्याप स्थगिती दिलेली नसल्याने पदोन्नतीच्या कोटयातील सर्व रिक्त पदे दिनांक २५.५.२००४ च्या स्थितीनुसार सेवाज्येष्ठतेने भरण्यात यावीत, असे निर्देश दिले आहेत. तसेच जे मागासवर्गीय अधिकारी/कर्मचारी सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दि. २५.५.२००४ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार पदोन्नतीमधील आरक्षणाचा लाभ घेऊन सेवा ज्येष्ठता यादीत वरच्या स्थानावर आले आहेत, असे अधिकारी/कर्मचारी

(अ) दि.२५.५.२००४ रोजी किंवा त्यापुर्वी शासन सेवेत रुजू झाले असल्यास ते त्यांच्या दि.२५.५.२००४ रोजीच्या सेवा ज्येष्ठतेनुसार पुढील पदोन्नतीस पात्र ठरतील व ;

(ब) दिनांक २५.५.२००४ नंतर शासन सेवेत रुजू झाले असल्यास ते त्यांच्या सेवाप्रवेशाच्या मुळ सेवा ज्येष्ठतेनुसार पुढील पदोन्नतीस पात्र ठरतील.

मा.सर्वोच्च न्यायालयाच्या विशेष अनुमती याचिका क्र. २८३०६/२०१७ वरील अंतिम निर्णयाच्या अधिन राहून भरण्यात यावीत असे निर्देश दिले आहेत. त्यानुसार उप अभियंता (स्थापत्य) यांना कार्यकारी अभियंता (स्थापत्य) पदावर तात्पुरती पदोन्नती देण्यात येत आहे.

२. पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी दिनांक १६ फेब्रूवारी, २०२४ रोजीच्या अधिसुचनेद्वारे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील कार्यकारी अभियंता (स्थापत्य) या संवर्गाचे सेवाप्रवेश विनियमन प्रसिध्द केलेले आहेत. सदर अधिसुचनेमधील कलम ४ नुसार, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील कार्यकारी अभियंता (स्थापत्य) यांची ५०:३५:१५ या सेवा भरती प्रमाणानुसार पदोन्नतीने पदे भरावयाची आहेत.

म.जी.प्रा. नवी मुंबई
उप अभियंता
शाखा
आवक क्र.
दिनांक:-

३. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या आस्थापनेवर कार्यकारी अभियंता (स्थापत्य) या पदोन्नतीच्या ३५ टक्के कोटयातील पदावर खालील विवरणपत्रातील उप अभियंता (पदवीधर) यांना शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, मुंबई दिनांक ७.५.२०२१ रोजीच्या शासन निर्णयातील मार्गदर्शक सुचनांनुसार, मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी याचिका क्र.२७९७/२०१५ या प्रकरणी दिनांक ४.८.२०१७ रोजी दिलेल्या निर्णयान्वये पदोन्नतीतील आरक्षण अवैध ठरविले असल्याने व मा.सर्वोच्च न्यायालयाने मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयास अद्याप स्थगिती

20243150484
11/9/24
Recd

दिलेली नसल्याने पदोन्नतीच्या कोटयातील सर्व रिक्त पदे दिनांक २५.५.२००४ च्या स्थितीनुसार सेवाज्येष्ठतेनुसार भरावयाची आहेत. ही बाब विचारात घेऊन रुपये एस-२३ : ६७७००-२०८७०० या वेतनश्रेणीत कार्यकारी अभियंता (स्था.) या पदावर तात्पुरती पदोन्नती देण्यात येत आहे. सदर पदोन्नत होणाऱ्या अधिकाऱ्यांना नागरी सेवा मंडळाच्या शिफारशी तसेच सक्षम प्राधिकाऱ्याच्या मान्यतेने कार्यकारी अभियंता (स्थापत्य) या पदावर पदोन्नतीच्या कोटयातील नियमित रिक्त पदावर तात्पुरती पदोन्नती देऊन खालील तक्त्यातील रकाना क्र.४ मध्ये दर्शविल्याप्रमाणे पदस्थापना देण्यात येत आहे.

| अ. क्र. | उप अभियंता (स्थापत्य) यांचे नांव | कार्यरत कार्यालयाचे नांव | कार्यकारी अभियंता (स्थापत्य) पदावरील पदोन्नतीनंतरची पदस्थापना | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | श्री.विनोद सोमेश्वर उद्धरवार | महाराष्ट्र जीवन प्राधिकरण उपविभाग मुल | कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, गडचिरोली जि.प.गडचिरोली | रिक्त पदी |

४. वरील विवरणपत्रातील उप अभियंता (स्थापत्य) यांना कार्यकारी अभियंता (स्थापत्य ) या संवर्गात खालील अटी/शर्तीच्या अधीन राहून केवळ तात्पुरती पदोन्नती देण्यात येत आहे.

अ. श्री. उध्दरवार, उप अभियंता यांना कार्यकारी अभियंता (स्थापत्य) या पदावर देण्यात येत असलेली तात्पुरती पदोन्नती ही सामान्य प्रशासन विभाग, मुंबई यांचे शासन निर्णय दि.७.५.२०२१ अनुसार तसेच मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी याचिका क्र.२७९७/२०१५ या प्रकरणी दि.४.८.२०१७ रोजी दिलेल्या निर्णयान्वये पदोन्नतीतील आरक्षण अवैध ठरविले असल्याने व मा.सर्वोच्च न्यायालयाने मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयास अद्याप स्थगिती दिलेली नसल्याने मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिकेच्या (विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७) अंतिम निर्णयाच्या अधिन राहून पदोन्नतीच्या कोटयातील रिक्त पदे निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात दि.२५.५.२००४ च्या स्थितीनुसार सेवाज्येष्ठतेनुसार देण्यात येत आहे.

ब. मा.सर्वोच्च न्यायालयाच्या अंतिम निर्णयाच्या तसेच भविष्यात महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची काही कार्यालये कमी कार्यभारामुळे बंद करावी लागल्यास किंवा अन्य कोणत्याही कारणास्तव पदावनत करण्याची आवश्यकता भासल्यास कोणतीही नोटीस किंवा पुर्वसूचना न देता कनिष्ठतम अधिकाऱ्यास "शेवटच्यास प्रथम"(Last come first go) या तत्वानुसार पदावनत करण्यात येईल व त्यांचा कार्यकारी अभियंता (स्थापत्य) पदाच्या ज्येष्ठतेवर हक्क राहणार नाही.

क. उक्त पदोन्नत कार्यकारी अभियंता (स्था) यांच्या उप अभियंता (स्थापत्य) सवंर्गाच्या सेवाज्येष्ठतेमध्ये काही बदल उद्भवल्यास त्यानुसार त्यांचे सेवाज्येष्ठतेमध्ये होणारा बदल नोंदवून आवश्यक ती अनुषंगिक पुढील कार्यवाही करण्यात येईल. परिणामी ज्येष्ठतेवर हक्क राहणार नाही. तसेच पदोन्नत अधिकाऱ्याविरुध्द कोणतेही न्यायालयीन / विभागीय चौकशी प्रकरण उद्भवल्यास किंवा विभागीय चौकशी प्रस्तावित अथवा प्रलंबित नसल्याच्या अटीच्या अधीन राहुन सदर पदोन्नती देण्यात येत आहे. तथापि श्री. उध्दरवार यांच्या आदेशाच्या दिनांकास विभागीय चौकशी/ न्यायालयीन प्रकरण दाखल झाल्यास त्यांचे बाबतीत सदर पदोन्नतीचे आदेश आपोआप रद्द होतील.

ड. पदोन्नत कार्यकारी अभियंता (स्थापत्य) यांनी पदस्थापनेच्या ठिकाणी एक महिन्याच्या आत रुजू व्हावे. तसेच पदोन्नत कार्यकारी अभियंता हे विहीत कालावधीत नेमणूकीच्या ठिकाणी रुजू झाले नाहीत तर त्यांचे पदोन्नतीचे आदेश आपोआप रद्द होतील. तसेच सदर पदोन्नती तात्पुरत्या स्वरुपाची असल्यामुळे, तात्पुरत्या पदोन्नतीच्या परिणामी श्री. उध्दरवार यांना नियमितपणाचा कोणताही हक्क मिळणार नाही.

इ. श्री. व्ही.एस. उध्दरवार, उप अभियंता (स्था.) यांचेविरुध्द विभागीय चौकशीचे प्रकरण प्रलंबित असल्याने, सन २०२३-२४ च्या निवडसुची वर्षात विभागीय पदोन्नती समितीने प्रकरण मोहोरबंद केले होते. तथापि त्यांची विभागीय चौकशी पुर्ण होऊन "ठपका" शिक्षा बजावण्यात आली आहे. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक १५.१२.२०१७ च्या शासन निर्णयातील परिच्छेत १(आठ) मधील तरतुदीनुसार विभागी पदोन्नती समितीच्या पहिल्या बैठकीत मोहोरबंद पाकीटात निष्कर्ष ठेवण्यात आलेल्या अधिकारी/ कर्मचाऱ्यांची दुसऱ्या व त्यापुढील विभागीय पदोन्नती समितीच्या नियमित बैठकीत पुन्हा पात्रता तपासण्याची आवश्यकता नाही. त्यामुळे प्राधिकरणाने त्यांचे मोहोरबंद पाकीट उघडुन त्यांना महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक १५.१२.२०१७ रोजीच्या शासन परिच्छेद १ (१४) (अ) नुसार सन २०२३-२४ च्या निवडसुचीमध्ये सेवा जेष्ठता क्रमांक लगतच्या पाच अधिकाऱ्यांच्या खाली आणुन पदोन्नतीसंदर्भाने कार्यवाही करुन, त्यांचे पदोन्नतीचे आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

ई. उपरोक्त पदोन्नत अधिकाऱ्यांनी त्यांच्या पदोन्नतीच्या पदावरील त्यांच्या वेतननिश्चिती संबंधीताचा विकल्प एक महिन्याच्या आत संबंधित कार्यालयास सादर करावा. विकल्प न दिल्यास त्यांची वेतन निश्चिती सरळ म.ना.से.(वेतन) नियम-१९८१ मधील नियम ११ (१) (ए) नुसार पदोन्नतीचा दिनांक विचारात घेऊन केली जाईल.

५. पदोन्नत कार्यकारी अभियंता (स्थापत्य) यांची पदोन्नतीनंतरची पदस्थापना ही बाब प्रशासकीय असल्याने त्यांना नियमानुसार बदली प्रवासभत्ता व पदग्रहण अवधी अनुज्ञेय राहील.

मान्यतेने.

29/01/24

**(दिपाली देशपांडे-सावेडकर)**
**मुख्य प्रशासकीय अधिकारी**

- मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा अध्यक्ष, म.जी.प्रा. यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
- प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई
- सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, एक्सप्रेस टॉवर्स, मुंबई

**प्रत :माहिती व कार्यवाहीसाठी**

- मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गडचिरोली.
- संचालक (वित्त), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको भवन, नवी मुंबई
- मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रादेशिक विभाग, नागपूर
- अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, चंद्रपूर
- अधीक्षक अभियंता (मुख्यालय), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, एक्सप्रेस टॉवर्स, मुंबई

- अधीक्षक अभियंता, म.जी.प्रा., मध्यवर्ती नियोजन संकल्पचित्र व संनियंत्रण कक्ष, मुंबई
- अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्रधिकरण, गुणवत्ता परिक्षण व दक्षता पथक, नवी मुंबई
- कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्रधिकरण विभाग, चंद्रपूर.
- कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, गडचिरोली जि.प.गडचिरोली.
- श्री. व्ही.एस. उध्दरवार, कार्यकारी अभियंता (स्था.)
- उप अभियंता, महाराष्ट्र जीवन प्रधिकरण उपविभाग, मुल
- उप अभियंता (आयटी सेल), महाराष्ट्र जीवन प्रधिकरण, बेलापूर, नवी मुंबई.
- कार्यालयीन आदेश धारिका